नि. फौ. ख. क्र.२०४/२०१६ निशाणी २५

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – मनोहर सदाशिव जेमेवार

वय – ६५ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – हाता, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस.आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. ०४.०५.२०१६ रोजी पोलीसांनी मला अमोल इंगळेच्या बहिणीच्या घरी हाता येथे बोलविले होते. पोलीसांनी पंचनामा केला होता. मी त्यावर सही केली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २६** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.ए.डी. निंबाळकर यांच्या मार्फत**

२. पंचनाम्यासाठी हजर राहणेसाठी पोलीसांनी मला नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पंचनामा झाला नाही. मला पंचनाम्यामध्ये काय लिहिलेले मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन सही केली. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४.०५.२०१६ रोजी माझ्या समक्ष पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामधील मजकुर मला वाचुन दाखविला नाही. (साक्षीदार स्वतःहुन साक्ष देण्याच्या कठडयातुन निघुन गेला.)

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.10.04 11:28:15 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर

बाळापूर.
दि.०३/१०/२०२५